मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन सहावा मजला,
नवी मुंबई ४०० ६१४.
दिनांक- ४ सितम्बर SEP 2002

(२०)

२९५(४)

## -: कार्यालयीन आदेश क्रमांक २६ :-

4/9/2002

विषय:- भार-अधिभाराचे प्रकरणांबाबत.
संदर्भ:- कोकण भवन, नवी मुंबई येथील राज्यस्तरीय बैठकीचे कार्यवृत्तांत
क्र.स्था१८/ब/सभा/एसएए/८१२, दिनांक १७/०७/२००२.

भार-अधिभार प्रकरणांची संख्या व त्यामध्ये गुंतलेल्या रक्कमेसंदर्भात संदर्भाधिन बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. भार-अधिभार प्रस्ताव करतांना येणाऱ्या अडचणीबाबतही आढावा घेण्यात आला यासंदर्भात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने खालिल आदेश देण्यात येत आहेत.

१) भार अधिभार प्रकरणे निकाली काढण्यासाठी सर्व विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांनी आयुक्त कार्यालयाशी मेळ ठेऊन प्रयत्न करावेत. यासाठी संबंधित मुख्य अधिकारी नगरपालिका यांना ठराविक लक्ष ठरवून देणेबाबत आयुक्तांकडे आग्रह धरावा आणि त्यावर लक्ष ठेवून जास्तीत जास्त भार-अधिभार प्रस्ताव निकाली निघतील असे पहावे.

२) जेव्हा स्थानिक संस्थेकडून लेखा परीक्षण अहवालाची उत्तरे/अनुपालन विहित मुदतीत प्राप्त होते तेव्हा अशी उत्तरे प्राप्त झाल्यापासुन एक महिन्याचे आत भार-अधिभार बाबतचे प्रस्ताव आयुक्तांकडे शिफारस होतील याकडे कटाक्षाने लक्ष द्यावे.

३) जेथे विहित वेळेत अशी उत्तरे/अनुपालन येत नाहीत त्याबाबतची भार-अधिभाराची शिफारस अशा विहित मुदतीनंतर केव्हाही म्हणजे आक्षेप प्रलंबित असेपर्यंत स्थानिक निधी लेखा विभागास संबंधित आयुक्तांकडे करता येत असले. तरी याबाबत जादा विलंब करण्यात येऊ नये.

४) अवर सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र क्र.स्थानिले १०९१/प्रक्र३२/९१/लेपनि, दिनांक २३ जून १९९२ ची प्रत यासोबत विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांना पुरविण्यात येत आहे. ही प्रत सर्व विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांनी संबंधीत आयुक्तांचे निदर्शनास आणावी आणि निर्णयाचे कारणास्तव काही नवीन भार-अधिभार प्रस्ताव प्रलंबित असल्यास सादर करावेत.

५) अवर सचिव, वित्त विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्र.स्थानिले १०९१/प्रक्र.१३२/९१/लेपनि, दिनांक २३ जून १९९२ ची प्रत विभागीय उपमुख्य लेखा परीक्षक यांनी त्यांचे अधिनस्त कार्यालयांत प्रसारीत करावी.

सोबत :- वरीलप्रमाणे.

मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य,
नवी मुंबई

प्रत - १) उपमुख्य लेखा परीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, विभाग (सर्व).
२) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, जिल्हा (सर्व).
३) उपमुख्य लेखा परीक्षक (पंरास), स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
४) अधिक्षक (अहवाल/पंरास) ५) सहाय्यक अधिक्षक (अहवाल)/ ओओ-२
६) अभिलेखापाल ७) फाईल- L-|- A-OO.

वराडे २८८२००२.